प्रेस नोट दिनांक ०४/१२/२०२४

**नोकराने केलेल्या चोरीचा गुन्हा उघडकीस आणून गुन्हयातील मालमत्ता हस्तगत केलेबाबत**

तक्रारदार महीला नामे कुमारी पांचाली संतोष ठाकुर, वय ५७ वर्षे, धंदा- व्यवसाय, रा.ठी- ई-५, तळ मजला, मेहरा भवन, अहींसा मार्ग, १४-, रोड, खार(प), मुंबई ५२ यांनी त्यांचे घरात त्यांची आईची देखभाल करणारी महीला नामे कुमारी महीमा नागेंद्र निशाद, वय- २० वर्षे हिने दि. १२/०५/२०२३ ते ०३/११/२०२४ या दरम्यान त्यांचे आईचे कपाटाच्या लॉकरमध्ये ठेवलेले १००० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व २ किलो चांदिचे दागिने चोरी केलेले आहेत. अशी तक्रार दिल्याने खार पोलीस ठाणे येथे दिनांक ०८/११/२०२४ रोजी गु.र.क्र. १०८९/२०२४ कलम ३०६ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा आजपावेतो केलेल्या तपास व तांत्रिक विश्लेषनावरुन सदरचा गुन्हा हा आरोपी क्र. १ कु. महीमा नागेंद्र निशाद वय २० वर्षे हिने तीचा साथिदार आरोपी क्र. ०२ रजनिश उर्फ विशाल शिवधन आर्या वय २२ वर्षे याचे सह केला असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. अटक आरोपींकडुन गुन्हयातील ६६५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व १ किलो चांदीचे दागिने असा **एकूण ४७,५९,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी ही मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग श्री. परमजितसिंग दहिया, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ श्री. दिक्षीत गेडाम, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, वांद्रे विभाग श्री. अधिकराव पोळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संजीव धुमाळ, खार पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. वैभव काटकर, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उप.नि श्री. कुंभारे व गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस अंमलदार श्री. भरत काच्चे, श्री. दिनेश शिर्के, श्री. योगेश तोरणे, श्री. महेश लहामगे, श्री. मनोज हांडगे, श्री. मयूर जाधव, महीला पोलीस अंमलदार श्रीमती पल्लवी बोराटे, श्रीमती अनिशा मोरे यांनी सदरची कामगिरी पार पाडली आहे.

-------oo--------